विचारमंथन | इको टुरिझम कार्यशाळेचा समारोप; नवी पर्यटनस्थळे विकसित करावीत, वाघांसोबत जंगलातील इतर प्राण्यांचेही रक्षण करणे ही सर्वांचीच जबाबदारी

# पर्यटन संस्कृती रुजवण्याची आवश्यकता

प्रतिनिधी | औरंगाबाद

नव्या पर्यटनस्थळांची निर्मिती आणि निसर्गातील सर्वच प्राण्यांना जगवणे गरजेचे आहे. पर्यटन वृद्धीसाठी स्थानिक लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे. इको टुरिझम सोसायटी ऑफ इंडिया (ईटीएसआय) आणि महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) च्या वतीने 'रिस्पॉन्सिबल टुरिझम, इश्यू अँड प्रॅक्टिसेस' या विषयावरील दोनदिवसीय ११ व्या कार्यशाळेचा शनिवारी समारोप झाला.

हॉटेल व्यवसायिक, वन विभाग, एमटीडीसी आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग होता. पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या या कार्यशाळेत सखोल चर्चा करण्यात आली. ईटीएसआयचे मानद उपाध्यक्ष राकेश माथूर यांनी देशामध्ये मुळापासून पर्यटनाचे महत्त्व रुजवणे गरजेचे आहे हा महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. पर्यटनाबाबत आपल्याकडे जागरूकता नाही. किंबहुना त्याकडे अर्थाजन तसेच राष्ट्रीय संपत्ती टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा दृष्टिकोनच विकसित झाला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याऐवजी नावे कोरणे, कचरा टाकणे आदी खोडसाळ प्रकार केले जातात. या बाबी पर्यटनासाठी घातक ठरत आहे. आशिया खंडामध्ये सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात मोठ्या प्रमाणात जैव विविधता आणि भरपूर नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. आपल्याकडे फक्त १ टक्का पर्यटनाचे प्रमाण असूनही आपल्याकडे पर्यटनाबाबत जागरूकता नसल्याचे माथूर यांनी म्हटले.



इको टुरिझम कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी सर्व उपस्थित मान्यवरांसह सहभागी प्रतिनिधी. छाया : रवी खंडाळकर

## कार्यशाळेत सहभागी झालेल्या मान्यवरांचे बोल...



लँडस्केप आर्किटेक्टचा पर्यटन विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. पर्यटन संस्थांना विकसित करणे तेथे नैसर्गिक वातावरणाची जपणूक करत राहण्याची व्यवस्था देण्याचे कौशल्य आमच्यात आहे. तेव्हा कार्यशाळेत अशा आर्किटेक्ट्सनाही महत्त्व द्यायला हवे होते. पर्यटनस्थळांच्या विकासात हरित पायाभूत सुविधा आणि नियोजनाची महत्त्वाची मदत होऊ शकते."

**अस्मिता दिवेकर**, लँडस्केप आर्किटेक्ट



जव्हार येथे राहणारे वारली आणि कच्छ येथे राहणारे कुकणा जमातीचे लोक आहेत. या ठिकाणी जर पर्यटन केले तर या लोकांची संस्कृती कळू शकते. त्यांचे खाद्यपदार्थ, लोकसंस्कृती यातून जपली जाईल. त्यांना उत्पन्न मिळेल. भरपूर नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण असलेल्या स्थळांचा यातून नवे पर्यटनस्थळ म्हणून उगमही होईल. नेहमीच्या पर्यटनस्थळांवरील ताण कमी होईल."

**राजश्री जोशी**, बायफ डेव्हलपमेंट रिसर्च



या दोनदिवसीय कार्यशाळेत पर्यटनाबाबतचे अनेक नवे पैलू स्पष्ट झाले. सध्या पंचतारांकित हॉटेलचालकांना याबाबत जागरूक केले जात आहे. यातूनच येणाऱ्या काळात मोठे बदल घडू शकतात, असा माझा विश्वास आहे."

**मेघा आठले**, संचालिका, हिरण्य रिसॉर्ट



ऐतिहासिक वास्तू जपण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. या वास्तूंच्या परिसरात राहणाऱ्या स्थानिकांना पर्यटनाच्या माध्यमातून उत्पन्न मिळणे हा त्यांचा हक्क आहे. आजच यासाठी प्रयत्न केले नाहीत तर येणाऱ्या पिढीसाठी या वास्तू राहणारच नाहीत."

**सुप्रिया गोदूरकर**, इनटॅक



वाइल्ड लाइफ पर्यटनाचे अनेकांना आकर्षण आहे. मात्र, ते नेमके कसे करावे याबाबत पर्यटकांना माहिती देणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धनाचेही शिक्षण देणे गरजेचे आहे. सध्या वाघांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. याकडे संपूर्ण जगाचे लक्ष केंद्रित झालेले आहे. मात्र, याशिवाय सागरी कासव, गिधाड आणि पांढऱ्या पोटाचे गरुडही कमी होत आहेत. त्यांच्याकडे आताच लक्ष देणे गरजेचे आहे. नाहीतर वाघांना वाचवण्यासाठी ज्याप्रमाणे कसरत सुरू आहे तशीच या प्राण्यांसाठी सुरू करावी लागेल. पर्यटकांसाठी 'होम स्टे' ही महत्त्वाची संकल्पना आहे. यातून स्थानिकांना रोजगार आणि पर्यटकांना आपली संस्कृती कळेल."

**रामाशिष जोशी**, सह्याद्री निसर्ग मित्र मंडळ, चिपळूण

## भारतातील पर्यटनस्थळांच्या संवर्धन, विकासासाठी मान्यवरांनी सुचवले अनेक उपाय

### लोकसहभाग गरजेचा



सीमा भट्ट यांनी लोकसहभाग वाढवण्याच्या मुद्द्याकडे सर्वांचे लक्ष वेधले. भारतात हजारो पर्यटनस्थळे आहेत. संपूर्ण जगाला आपल्या भारतीय संस्कृतीचे आकर्षण आहे. स्थानिक लोककला, खाद्यसंस्कृती आणि तेथील परंपरा याविषयी युरोप, अमेरिकेसह अनेक देशांत विलक्षण कुतूहल आहे. या कुतूहलापोटीच ते येथे येतात. त्यांना संस्कृतीसोबत येथील स्वच्छतेचे दर्शन घडवणे गरजेचे आहे. यासाठी त्या पद्धतीच्या गेस्ट हाऊसची बांधणी करावी. स्थानिकांना त्यात काम द्यावे. त्यांना रोजगार मिळेल. पर्यटकांना आपल्या संस्कृतीचा अनुभव मिळेल, असेही त्या म्हणाल्या.

### नैसर्गिक स्रोत वापरा



ईटीएसआयचे सदस्य निरंजन खत्री यांनी सांगितले की, पंचतारांकित हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणात पाणी, वीज तसेच इतर नैसर्गिक बाबींचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. लागेल तेवढ्याच पाण्याचा वापर करा. हवा असेल तेव्हाच एसी वापरा. जर एखादा पर्यटक २ किंवा ३ दिवस राहणार असेल तर त्यासाठी रूमचे पडदे, टेबल कव्हर्स, बेडशीट्स दररोज बदलण्याची गरज नाही. कारण यामुळे पाण्याचा अपव्यय होतो. इनडोअर झाडे लावल्यामुळे रूमचे वातावरण आल्हाददायक होईल. एसी लावणे टाळता येईल, असा सल्लाही खत्री यांनी दिला.

### नवी पर्यटनस्थळे शोधावीत



पुण्याच्या पुगमार्क संस्थेचे अनिरुद्ध चाओजी म्हणाले, नवी पर्यटनस्थळे शोधायला हवीत. त्यांचा विकास करावा. कारण यातून नेहमीच्या पर्यटनस्थळांवरचा ताण कमी होईल. लोकांना नव्या जागा पाहता येतील. स्थानिकांना यातून अर्थार्जनाचे साधन मिळेल. होम स्टे म्हणजे पर्यटकांना स्थानिकांच्या घरातच राहून तेथील स्थानिक पदार्थांचा आस्वाद घेता यावा हे पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरेल. याशिवाय वाघांची संख्या खूप कमी झाली आहे. मात्र, यासोबतच इतर प्राण्यांच्या संवर्धनाचीही गरज आहे. त्यांचा प्रश्न भीषण होण्याआधीच लक्ष देणे गरजेचे आहे.

### पर्यटकांना संस्कृतीशी जोडा



कार्यशाळेचे मुख्य अरविंद बालन म्हणाले, २००८ मध्ये देशांतर्गत तसेच विदेशी पर्यटन वाढवण्यात यावे यासाठी इको टुरिझम सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. भारतालगत असलेल्या लहान लहान देशांमध्ये पर्यटनाच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळत आहे. मात्र, भारताला पर्यटनातून फारसे उत्पादन होत नाही. यातून या सोसायटीची निर्मिती झाली. हॉटेल व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था, संशोधक, वन विभाग यांच्या सर्वांच्या माध्यमातून पर्यटनाच्या नव्या दिशा ठरवणे, त्यातील त्रुटी शोधून सोसायटीच्या माध्यमातून विचारमंथन केले जात आहे.

### वन पर्यटनातून उत्पन्न



विभागीय उपवन संरक्षक मेयीपोक्कीम अय्यर म्हणाले, वन पर्यटनासाठी आम्हीसुद्धा प्रयत्नशील आहोत. ११ सर्कलपैकी मराठवाड्यामध्ये १ सर्कल आहे. यामध्ये आम्ही ७ ते ८ स्थळांची निवड वनपर्यटनाचा विकास करण्यासाठी केली आहे. यामध्ये आम्ही प्रवेश फी, पार्किंग फी ठेवणार आहोत यातून त्याच परिसराच्या विकासासाठी रक्कम उपलब्ध होईल. मेळघाटामध्ये याच धर्तीवर आम्ही होम स्टे टुरिझम सुरू केले. यातून गावकऱ्यांना दोन लाखांचे उत्पन्न मिळाले. यातून पर्यटनाला चालना तर मिळतेच, शिवाय गावकऱ्यांना उत्पन्नाची साधनेही उपलब्ध होतात.